# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
## कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

२१ ऑक्टोंबर, २०१७



☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
✍: 7276494810 (PRO)


### ❖ पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांचे मार्गदर्शनाखाली विशेष मोहीमेतंर्गत अवैध दारूविक्रीच्या जिल्हयात एकुण २३ केसेस :-

महाराष्ट्र शासनाचे आदेशान्वये चंद्रपूर जिल्ह्यात दिनांक ०१/०४/२०१५ पासुन दारूबंदी घोषीत करण्यात आलेली असुन पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात विशेष मोहीम राबवुन **दिनांक २०/१०/२०१७ चे ००:०१ ते २३:५९ वाजता पर्यंत जिल्ह्यात पोलीस स्टेशन दुर्गापुर, घुग्घुस, वरोरा, माजरी, चिमुर, नागभीड, मुल, सिंदेवाही, सावली, कोठारी, कोरपना, गडचांदुर, पाटण,** हद्दीत **एकुण २,५२,१६०/-रू** ची अवैध दारू जप्त करण्यात आली आहे. पोलीस स्टेशन ला एकुण **२३** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन **१७** आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

---

### ❖ मद्य प्राशन करून वाहन चालविणाऱ्या मद्यपी वाहन चालकांवर कार्यवाही :-

**पोलीस स्टेशन भद्रावती :-**

दिनांक २०/१०/२०१७ रोजी पोलीस स्टेशन भद्रावती अंतर्गत ०४ आरोपी इसम हे आपआपले ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूचे नशेत रोडवर धोकादायक स्थितीत भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवित असताना मिळुन आल्याने पोलीस स्टेशन भद्रावती येथे अप.क्र. ९८२/२०१७, ९८३/२०१७, ९८४/२०१७ व ९८५/२०१७ कलम २७९ भादंवि सह १८५ मोवाका अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे. सदर गुन्हयातील ०३ आरोपीस अटक करण्यात आले असून पुढील तपास **भद्रावती** पोलीस करीत आहे.

---

### ❖ पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी हद्दीत संशयास्पदरित्या फिरणाऱ्या आरोपीतांना अटक:-

दिनांक २०/१०/२०१७ रोजी ब्रम्हपुरी पोलीस स्टेशन अंतर्गत नांदगाव रोडवर २१:५१ वाजता दरम्यान ०१ आरोपी इसम हा आपले अस्तित्व लपवुन कोणतातरी हस्तपेक्षीय गुन्हा करण्याचे उददेशाने फिरत असता मिळुन आल्याने पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी येथे अप. क्र. १०१०/२०१७ कलम १२२ मुंबई पोलीस कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन पुढील तपास **ब्रम्हपुरी** पोलीस करीत आहे.

---

### ❖ प्रतिबंधक कारवाई :-

दिनांक २०/१०/२०१७ रोजी जिल्ह्यात, कलम १०७ दंड प्रक्रिया संहिता अन्वये ०८, कलम १२२ मुंबई पोलीस कायदा अन्वये ०१, कलम ११०/११७ मुंबई पोलीस कायदा अन्वये ०२ असे एकुण **११** ईसमांवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.

---

### ❖ मोटार वाहन कायदा अन्वये कारवाई :-

दिनांक २०/१०/२०१७ रोजी जिल्ह्यात मोटार वाहन कायदा अन्वये रिफलेक्टर/नोपार्किंग ०५, दारू प्राशन १८५ अन्वये ०६ इतर केसेस १९४ असे एकुण **२०५** केसेस करण्यात आल्या आहेत.

---

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# चंद्रपुर जिल्हा पोलीस मुख्यालयात ''हुतात्मा स्मृतीदिनी'' शहीद पोलीसांना श्रध्दांजली

२१ ऑक्टोबर १९५९ रोजी लडाख भागात हॉट स्प्रिंग येथुन सहा मैल पुर्वेला केंद्रीय राखीव पोलीस दलाची तुकडी कडाक्याच्या थंडीमध्ये नेहमीप्रमाणे भारत तिबेट सिमेवर टेहळणी करीत होती. त्यांच्यावर चिनी सैनिकांनी अचानक अत्याधुनिक शस्त्रामधुन गोळ्यांचा वर्षाव सुरू केला. तेव्हा १९ जणाच्या पोलीस दलाच्या या तुकडीने आपले प्राण पणाशी लावुन त्यांचा प्रतिकार केला. त्यापैकी १० जवानांनी देशासाठी आपले प्राण अर्पण केले. आपल्या देशातील पोलीसांनी देशासाठी केलेल्या बलीदानास व शहीदांच्या स्मृतींना श्रध्दांजली अर्पण करण्याकरीता दिनांक २१ ऑक्टोंबर हा दिवस पोलीस हुतात्मा स्मृतीदिन म्हणुन पाळण्यात येतो.

दिनांक २१ ऑक्टोंबर २०१७ रोजी सकाळी ०८.३० वाजता पोलीस मुख्यालय, चंद्रपुर येथील हुतात्मा स्मारक येथे संपुर्ण भारत देशातील दिनांक १ सप्टेंबर २०१६ ते २१ ऑक्टोबर २०१७ या कालावधीत कर्तव्य बजावित असतांना एकुण ३७९ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी देशासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. शहींदाचे नाव वाचन करून त्यांना सलामी गार्ड व बॅन्ड पथकासह शोक सलामी अर्पीत करण्यात येवुन बंदुकीच्या फैरी हवेत झाडुन श्रध्दांजली देण्यात आली. प्रामुख्याने सदर हुतात्मा स्मृती दिनाच्या कार्यक्रमास केंद्रीय राखीव पोलीस बल गटातील शहीद अजीत दास यांचे कुटूंब रा. वलनी, पोस्टे बोर्डा जि. चंद्रपुर व शहीद नंदकुमार आत्राम रा. बोर्डा, जि. चंद्रपुर यांचे कुटूंब सुध्दा उपस्थित होते. या श्रध्दांजली कार्यक्रमाकरीता मा.ना.श्री. हंसराज अहीर, केंद्रीय गृहराज्य मंत्री, भारत सरकार हे प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच अपर पोलीस अधीक्षक श्री. हेमराजसिंह राजपूत, व जिल्हयातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस स्टेशन व शाखा प्रभारी अधिकारी, व कर्मचारी उपस्थित होते. श्रध्दांजली कार्यक्रमास प्रामुख्याने उपस्थित असलेले मा.ना.श्री. हंसराज अहीर, केंद्रीय गृहराज्य मंत्री, भारत सरकार आणि अपर पोलीस अधीक्षक व सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी पोलीस दलातील हुतात्मा यांना पुष्पचक्र अर्पण करून श्रध्दांजली दिली.

शहीद जवानांच्या नावाचे वाचन श्री. यामावार उपविभागीय पोलीस अधिकारी गडचांदुर, आणि श्री. देसाई परीविक्षाधीन उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी केले.

---

❖ **सदोष मनुष्यवधाचा गुन्हा करणाऱ्या अज्ञात आरोपी व वाहनाचा स्थानिक गुन्हे शाखेकडुन २४ तासात शोध :-**

दिनांक:१९/१०/२०१७ चे रात्रौ ११:०० ते ११:१५ वाजता दरम्यान पोलीस स्टेशन वरोरा अतंर्गत खांबाडा चेक पोस्टवर पोलीस कर्तव्य बजावित असताना चंद्रपुरकडुन नागपुरकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या महीन्द्रा बोलेरो वाहनास बॅरिकेट्स लावुन थांबविण्याचा प्रयत्न करीत असताना वाहन चालकाने वाहन न थांबविता त्या ठिकाणी असलेल्या एका ईसमाचे अंगावर वाहन घालुन गंभीर जखमी केले. जखमी इसमास पोलीसांनी लागलीच ॲम्ब्युलन्समध्ये उपजिल्हा रुग्णालय, वरोरा येथे उपचाराकरीता घेवुन गेले असता तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी उपचारादरम्यान जखमी इसम मृत झाल्याचे घोषित केले. त्यावरून वाहनासह पळुन गेलेल्या अज्ञात वाहनधारकाविरुध्द पो.स्टे.वरोरा येथे अप.क्र.१३०१/२०१७ कलम ३०४ भा.दं.वि. सहकलम १३४ (ब) मोटार वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

तपासादरम्यान श्री. हेमराजसिंह राजपूत अपर पोलीस अधीक्षक, चंद्रपूर व श्री. प्रताप पवार उपविभागीय पोलीस अधिकारी, वरोरा यांचे मार्गदर्शनात पो.स्टे. वरोरा येथील स्थानिक पोलीस व स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर यांनी जलदगतीने सखोल तपास सुरू केला. तपासादरम्यान स्थानिक गुन्हे शाखा प्रभारी अधिकारी श्री. सुधाकर अंभोरे यांचे नेतृत्वात तपास करीत असलेल्या पोउपनि सुनिल उईके यांचे तपास पथकास मिळालेल्या गोपनिय माहितीवरून तसेच तांत्रिक बाबींच्या आधारे नागपूर येथुन एका आरोपीस ताब्यात घेतले. त्यास विचारपूस केली असता नमूद आरोपी हा महिंद्रा बोलेरो या वाहनाचा चालक असून त्याने प्राथमिक तपासात गुन्ह्याची कबुली दिली असून वाहनाचा सुध्दा शोध लागला आहे. आरोपीस न्यायालयासमोर हजर केले असता त्यास पोलीस कस्टडी रिमांड मिळाला आहे. पुढील तपास सुरू आहे.

---